# मुंबई पोर्ट ट्र्स्ट कर्मचारी
## (निवासस्थानांचे वाटप व ताबा)
# विनियम, १९७५

# <u>मुंबई पोर्ट ट्रस्ट</u>

टी.आर. क्रमांक ३३२, दिनांक २४ जून, १९७५ चे परिशिष्ट

मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (निवासस्थानांचे वाटप व ताबा) विनियम, १९७५

(टी.आर. क्रमांक ३४०, दिनांक ८.११.१९७७ अन्वये मंजूर आणि भारताचे राजपत्र, भाग दोन, विभाग ३, (उपविभाग (एक) दिनांक ९.३.१९७८ रोजी प्रसिद्ध जीएसआर क्रमांक १६३(ई), दिनांक ९.३.१९७५ पासून अंमलात) यात प्रसिद्ध केलेली नौकानयन व परिवहन मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक पीईबी - ८३/७७, दिनांक ७.३.१९७८ अन्वये सरकारकडून मंजूर).

# मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी
# (निवासस्थानांचे वाटप व ताबा) विनियम, १९७५

-----------

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ - (१) या विनियमांस, मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (निवासस्थानांचे वाटप व ताबा) विनियम, १९७५ असे म्हणावे.

(२) ते, दिनांक ४.९.१९७५ रोजी अंमलात येतील.

२. <u>प्रयुक्ती</u>

हे विनियम, मुंबई पोर्ट ट्रस्टच्या सर्व कर्मचा-यांना करण्यात येणा-या निवासस्थानांच्या वाटपास लागू होतील.

३. <u>व्याख्या</u>

या विनियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, -

(क) निवासस्थानाच्या संबंधात "प्रशासन प्राधिकारी" म्हणजे त्या निवासस्थानाच्या प्रशासनाकरिता अध्यक्ष वेळोवेळी नियुक्त करील असा अधिकारी किंवा असे अधिकारी, असा आहे.

(ख) "वाटप" याचा अर्थ, या विनियमांच्या तरतुदींनुसार एखाद्या निवासस्थानाचा ताबा घेण्यासाठी लायसन्स देणे, असा आहे.

(ग) "मंडळ", "अध्यक्ष" व "विभाग प्रमुख" या संज्ञांना मुख्य पोर्ट ट्रस्ट अधिनियम, १९६३ यामध्ये त्यांना अनुक्रमे जे अर्थ नेमून दिले असतील तेच अर्थ असतील.

(घ) "वित्तलब्धी" याचा अर्थ -

(क) मुंबई पोर्ट सागरी सेवा चौकशी समिती, १९६७ किंवा मुख्य बंदरे [वर्ग एक व वर्ग दोनच्या सागरेतर सेवा] वेतन समिती, १९७२ यांच्या शिफारशींच्या अंमलबजावणी करताना लागू केलेल्या वेतनश्रेणीवरील कर्मचा-यांच्या बाबतीत -

(टी.आर. क्रमांक ३४०, दिनांक ८.११.१९७७ अन्वये मंजूर आणि भारताचे राजपत्र, भाग दोन, विभाग ३, (उपविभाग (एक) दिनांक ९.३.१९७८ रोजी प्रसिद्ध जीएसआर क्रमांक १६३(ई), दिनांक ९.३.१९७५ पासून अंमलात) यात प्रसिद्ध केलेली नौकानयन व परिवहन मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक पीईबी - ८३/७७, दिनांक ७.३.१९७८ अन्वये सरकारकडून मंजूर).

(१) स्थानापन्नता वेतन, वैयक्तिक वेतन, विशेष वेतन, तांत्रिक वेतन, महागाई वेतन आणि वेतन म्हणून वर्गीकृत केलेल्या इतर काणत्याही वित्तलब्धी यांसह वेतन; असा आहे.

(२) महागाई भत्ता व भोजन भत्ता याव्यतिरिक्त इतर पूरक भत्ते असा आहे;

(३) पदांच्या प्राधिकृत वित्तलब्धीचा भाग म्हणून मिळणारे मासिक वेतन आणि भत्ते यांच्या ठराविक रकमेच्या स्वरूपात प्राप्त होणारा अतिकालिक भत्ता वगळून इतर प्रदाने आणि भत्ते; असा आहे.

(४) जादा निवृत्तिवेतनाव्यतिरिक्त इतर निवृत्तिवेतन असा आहे;

(५) निलंबनाधीन असताना आणि त्याबाबत उचित निर्वाह अनुदान व पूरक भत्ता कोणताही असल्यास, मिळत असताना अशा निर्वाह अनुदानाची व पूरक भत्त्याची रक्कम, कोणतीही असल्यास असा आहे, परंतु एखाद्या कर्मचा-याला निलंबन कालावधीचे वेतन घेण्याची नंतर मुभा दिली असेल तेव्हा अशा प्रकारे मुभा दिलेले वेतन आणि उचित असा पूरक भत्ता, आणि असे वेतन व भत्ते यांव्यतिरिक्त ठराविक रकमेच्या स्वरूपात देण्यात येणारी इतर कोणतीही प्रदाने ही, त्या कालावधीसाठी त्याची वित्तलब्धी समजण्यात येईल.

(ख) बंदरे व गोदी कामगारांच्या वेतन सुधार समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करतांना लागू केलेल्या वेतनश्रेणीवरील एखाद्या कर्मचा-याच्या बाबतीत, -

(१) वैयक्तिक वेतन, विशेष वेतन, तांत्रिक वेतन किंवा मंडळाने वेतन म्हणून वर्गवारी केलेल्या इतर कोणत्याही वित्तलब्धी वगळून, पूर्वोक्तप्रमाणे वेतन श्रेणीतील मूळ वेतन, असा आहे;

(२) निलंबनाधीन असताना आणि निर्वाह अनुदान प्राप्त करताना अशा निर्वाह अनुदानाची रक्कम असा आहे. परंतु, जर एखाद्या कर्मचा-याला निलंबनाच्या कालावधीचे वेतन घेण्याची नंतर मुभा दिली असेल तेव्हा अशा प्रकारे मुभा दिलेले वेतन, त्या कालावधीसाठीची त्याची वित्तलब्धी म्हणून समजण्यात येईल.

<u>स्पष्टीकरण:</u>

(एक) रजेवर असलेल्या एखाद्या कर्मचा-याची वित्तलब्धी याचा अर्थ, त्याने रजेवर जाण्यापूर्वी त्याने कर्तव्य बजावलेल्या मागील संपूर्ण कॅलेंडर महिन्यासाठी त्याने घेतलेली वित्तलब्धी, असा आहे.

(दोन) निलंबित केलेल्या कर्मचा-याच्या बाबतीत, ज्याला नंतर पुन:स्थापित केले असेल आणि ज्याच्या निलंबनाच्या कालावधीस रजा समजण्यात आली असेल, अशा निलंबित कर्मचा-याच्या बाबतीत वरील स्पष्टीकरण (एक) अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

(ङ) "कुटुंब" याचा अर्थ, (एक) पत्नी किंवा यथास्थिती पती; (दोन) माता वा

पिता, मुले व सावत्र मुले; (तीन) भाऊ व बहिणी मात्र ते निवासस्थान वाटप झालेल्या कर्मचा-यावर अवलंबून असावेत; [1][(चार)निवासस्थान वाटप झालेल्या कर्मचा-याचे जवळचे नातेवाईक आणि त्याच्याच निवासस्थानात राहण्यास प्रशासकीय प्राधिका-याद्वारे विनिर्दिषपणे प्राधिकृत केलेले आहे असे त्या कर्मचा-याचे जवळचे नातेवाईक असा आहे.]

*(च) (एक) विनियम ५ अन्वये कर्मचारी ज्या प्रकारचा निवासस्थास पात्र असेल त्याबाबत पोर्ट ट्रस्ट व गोदी कामगार वेतन सुधार समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीत लागू केलेल्या वेतनश्रेणीवरील वर्ग चार प्रकारच्या निवासस्थानासाठी एखाद्या कर्मचा-याचा प्रारंभिक वाटपाचा "अग्रक्रम दिनांक" याचा अर्थ ज्या दिनांकापासून तो मुंबई पोर्ट ट्रस्ट मध्ये अखंडीत सेवा करीत असेल, असा दिनांक, असा आहे, परंतु, दोन किंवा अधिक कर्मचा-यांचा अग्रक्रम दिनांक एकच असेल त्याबाबतीत त्यांच्यामधील अग्रक्रम, विनियम ६ च्या पोर्ट विनियम (१) आणि (४) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सूचीला ज्या दिनांकास प्रशासन प्राधिका-याने अंतिम रुप दिले असेल अशा दिनांकास अशा प्रत्येक कर्मचा-याने घेतलेल्या वेतनाच्या रकमेवरुन निर्धारित केला जाईल, उच्चतम वेतन घेणा-या कर्मचा-याला, कमी वेतन घेणा-या कर्मचा-यापेक्षा आधीचा अग्रक्रम दिला जाईल आणि ज्या दिनांकास प्रशासन प्राधिकरणाने विनियम ६ च्या पोट विनियम (१) आणि (४) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सूचीला ज्या दिनांकास अंतिम रुप दिले असेल त्या दिनांकास दोन किंवा अधिक कर्मचा-यांचा अग्रक्रम दिनांक आणि त्यांनी घेतलेल्या वेतनाची रक्कम एक सारखीच असेल त्याबाबतीत त्यांच्यामधील अग्रक्रम हा अशा कर्मचा-याच्या जन्मतारखेवरून निर्धारित करण्यात येईल. यात वयाने मोठा असलेला कर्मचारी, वयाने लहानअसलेल्या कर्मचा-यापेक्षा आधीचा अग्रक्रम प्राप्त करील.

(दोन) वर्ग तीन-क, तीन-ब व तीन-अ प्रकारच्या निवास्थानांच्या प्रारंभिक वाटपासाठी आणि उच्चतम प्रकारच्या निवासस्थानामध्ये म्हणजे वर्ग चार मधून वर्ग तीन-क मध्ये, वर्ग तीन-क मधून, वर्ग तीन-ब मध्ये आणि वर्ग तीन-ब मधून तीन-अ मध्ये, प्रकारे स्थानांतरित होण्यासाठी एखाद्या कर्मचा-याचा "अग्रक्रम दिनांक" याचा अर्थ, तो त्या प्रकारच्या निवासस्थानासाठी ज्या दिनांकास पात्र ठरला, तो दिनांक, असा आहे, परंतु, दोन किंवा अधिक कर्मचा-यांचा अग्रक्रम दिनांक एकच असेल त्याबाबतीत, त्याच्यामधील अग्रक्रम ज्या दिनांकापासून तो बीपीटी मध्ये अखंडित सेवा करीत असेल त्या दिनांकावून निर्धारित करण्यात येईल हेही दिनांक एकच असतील तेव्हा, वरिष्ठता निर्धारित करण्यासाठी खंड 3 (च)(एक) मध्ये नमूद केलेले इतर निकष लावण्यात येतील.

---

* बी.पी.टी. कर्मचारी (निवासस्थानांचे नियत वाटप व ताबा) विनियम, १९७५ दिनांक २८.४.१९९३ चा टी.आर.क्र.२४९ तसंच दि.१६.९.१९९४ रोजीच्या भारताच्या राजपत्रात जीएसआर ६९२(ई) म्हणून प्रसिद्ध केलेल्या एमओएसटीच्या मंजूरीने सुधारित कराण्यात आले.

(छ) "भाडे" याचा अर्थ, या विनियमान्वये वाटप केलेल्या निवासस्थानाच्या संबंधात विनियम ११ च्या तरतुदींनुसार दरमहा देय असलेली एकूण रक्कम, असा आहे.

(ज) "निवासस्थान" याचा अर्थ, कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय असल्यास यांच्या राहण्यासाठी असलेले निवास स्थान असा आहे आणि त्यामध्ये शयनशाळेतील निवासस्थानाचा समावेश नाही.

टिप - निवासस्थानाचा ताबा असलेल्या एखाद्या कर्मचा-याला मोटारघर मग ते कंपाउंडच्या किंवा आवाराच्या आत असो किंवा बाहेर असो, देण्यात आले असेल त्याबाबतीत ते मोटारघर त्या निवासस्थानाचाच एक भाग असल्याचे मानण्यात येईल.

(टी.आर. क्र.३४०, दि.८.११.१९७७ अन्वये मंजूर आणि भारताचे राजपत्र, भाग दोन, विभाग ३, उपविभाग (एक) दिनांक ९.३.१९७८ रोजी प्रसिद्ध जी.एस.आर. क्रमांक १६३(ई), ४.९.१९७५ पासून लागू, यात प्रसिद्ध केलेली नौकायन व परिवहन मंत्रालयाची अधिसूचना क्र.पीईबी-८५/७७, दिनांक ७.३.१९७८ अन्वये सरकारकडून मंजूर).

(झ) "दर्जेदार निवासस्थान" याचा अर्थ, उप-प्रमाण म्हणून वर्गवारी केलेल्या निवासस्थानाव्यतिरिक्त इतर निवासस्थान, असा होता.

(ञ) "दुय्यम दर्जाचे" निवासस्थान याचा अर्थ, निवासस्थानाच्या श्रेणी, पुरविण्यात आलेल्या सुखसोई, निवासस्थानाचे स्वरुप व स्थिती आणि इतर घटक, लक्षात घेऊन मंडळाने दुय्यम दर्जाच्या म्हणून वर्गवारी केलेले असेल असे निवासस्थान असा आहे.

(ट) "पोट-भाडयाने देणे" यामध्ये, निवासस्थानाचे वाटप झालेल्या कर्मचा-याने दुस-या व्यक्तीकडून भाडे घेऊन किंवा भाडे न घेता अशा दुस-या व्यक्तीसह निवासस्थानामध्ये एकत्र राहणे याचा समावेश होतो.

स्पष्टीकरण: खंड (ङ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे निवासस्थान वाटप झालेल्या कर्मचा-याने कुटुंबीयांसह एकत्र राहण्याची कोणतीही बाब ही "पोट-भाडयाने देण्याची बाब ठरते" असे मानण्यात येणार नाही.

(ठ) कर्मचा-याच्या बाबतीत "प्रकार" याचा अर्थ, विनियमा अन्वये तो ज्या निवासस्थानास पात्र आहे अशा निवासस्थानाचा प्रकार, असा आहे.

(ड) "कल्याण अधीक्षक " याचा अर्थ, निवासस्थानांची देखरेख करण्यासाठी नियुक्त केलेला कर्मचारी असा आहे.

*४. (क) वाटपासाठी पात्रता:

असे कर्मचारी ज्या कर्मचा-यांनी स्वत: किंवा त्यांच्या वैवाहिक जोडीदारांनी मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी गृहनिर्माण कर्ज नियमावली खालील कर्ज घेऊन किंवा कर्ज न घेता, बृहनमुंबईत आणि पश्चिम रेल्वेवरील दहिसर पर्यंत, नवी मुंबईतील वाशीपर्यंत आणि ठाणे पर्यंत कोणत्याही ठिकाणी घरे किंवा सदनिका संपादित केलेल्या असतील तर, असे कर्मचारी बी.पी.टी. चे निवासस्थान वाटपासाठी पात्र ठरल्यास, आणि जर ते मुंबई विश्वस्त मंडळ वेळोवेळी मान्यता देईल अशा मुदतीपर्यंत व अशा अटी व शर्तींवर ज्यांनी आपली घरे किंवा सदनिका बंदर विश्वस्तमंडळाच्या स्वाधीन करणे आवश्यक असेल. जे कर्मचारी वैध कारणास्तव आपले घर किंवा सदनिका स्वाधीन करण्याच्या आवश्यकतेचे अनुपालन करण्यास असमर्थ असतील अशा कर्मचा-यांच्या बाबतीत मुंबई बंदर विश्वस्त मंडळाचा अध्यक्षास आपल्या स्वेच्छा निर्णयाने हा निकष शिथिल करता येईल.

(ख) पती वा पत्नीस घराचे वाटप करणे - ज्या स्त्री-पुरुष कर्मचा-यांचा एकमेकांशी विवाह झाला असेल अशा कर्मचा-यांच्या बाबतीतील पात्रता:

(१) यथास्थिति, कर्मचा-याच्या पतीला किंवा पत्नीला अगोदरच निवासस्थानाचे वाटप करण्यात आले असेल तर, असे निवासस्थान परत केल्याखेरीज, अशा कोणत्याही कर्मचा-याला या विनियमान्वये निवासस्थानाचे वाटप करण्यात येणार नाही:

परंतु, कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या न्यायिक फारकतीच्या आदेशानुसार पती-पत्नी विभक्तपणे राहत असतील त्याबाबतीत, हे पोट-विनियम लागू होणार नाहीत.

(२) या विनियमान्वये वाटप केलेल्या वेगवेगळ्या निवासस्थानांमध्ये राहणार दोन किंवा अधिक कर्मचारी एकमेकांशी विवाहबध्द होतील त्याबाबतीत, ते अशा विवाहाच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत त्या निवासस्थानांपैकी एक निवासस्थान परत करतील.

(३) पोट-विनियम (२) अन्वये आवश्यक केल्याप्रमाणे एक निवासस्थान परत न केल्यास, निम्नतम प्रकारच्या निवासस्थानाचे वाटप, असा कालावधी समाप्त झाल्यावर रद्द करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि जर वाटप केलेली निवसस्थाने एकाच प्रकारची असतील तर त्यापैकी, अध्यक्ष किंवा प्रशासन प्राधिकारी ठरवील अशा एका निवासस्थानाचे वाटप असा कालावधी समाप्त झाल्यावर रद्द करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

---

* बी.पी.टी. कर्मचारी (निवासस्थानांचे वाटप व ताबा) विनियम, १९७५ दिनांक २८.४.१९९३ चा टी.आर.क्र.२४९ तसेच दि.१६.९.१९९४ रोजीच्या भारताच्या राजपत्रात जीएसआर ६९२(ई) म्हणून प्रकाशित केलेल्या एमओएसटी याद्वारे मंजूरी प्राप्त.

५. <u>निवासस्थानांचे वर्गीकरण:</u>

या विनियमांन्वये अन्यथा तरतूद केले असेल त्या व्यतिरिक्त, कर्मचारी खालील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या प्रकारच्या निवासस्थानाच्या वाटपासाठी पात्र ठरेल:-

| निवासस्थानाचा प्रकार | निवासस्थानाचे वाटप करण्यात आले असेल त्या दिनांकास असलेले कर्मचा-याचे वेतन |
|---|---|
| (१) | (२) |
| वर्ग चार | वेतन मर्यादा विचारात न घेता वर्ग चारचे सर्व कर्मचारी |
| वर्ग तीन-क | रु३०२० पर्यंत वेतन घेणारे वर्ग तीनचे कर्मचारी |
| वर्ग तीन-ब | रु३०२० पेक्षा अधिक परंतु जास्तीत जास्त रु३७९० इतके वेतन घेणारे वर्ग तीनचे कर्मचारी |
| वर्ग तीन-अ | रु३०२० पेक्षा अधिक वेतन घेणारे वर्ग तीनचे कर्मचारी |

स्पष्टीकरण: (१) या विनियमाच्या प्रयोजनार्थ, वेतन याचा अर्थ, एखाद्या कर्मचा-याने नियमित तत्वावर धारण केलेल्या पदावरील त्या कर्मचा-याचे वेतन, असा आहे.

(२) वरील तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये दर्शविण्यात आलेली वेतन मर्यादा टी.आर. क्र.६७८, दि. २२.१२.१९९४ अन्वये १.१.१९९३ पासून मंजूरी दिलेल्या समझोता ज्ञापनाच्या अंमलबजावणीत लागू केलेल्या संरचनेनुसार दर्शविण्यात आली आहेत आणि त्या, अध्यक्ष अधिसूचित करील अशा प्रकारच्या भावी वेतन सुधारणांच्या वेतन मर्यादांशी अनुरुप असतील.

(३) विद्यमान निवासस्थान त्यांची संख्या व प्रकार आणि इतर संबंधित माहिती दर्शविणारी सूची या विनियमांच्या जोडपत्र एकमध्ये निर्दिष्ट केली आहे. अध्यक्ष वेळोवेळी ठरवील असा प्राधिकारी त्या सूचीत नावांची कोणतीही भर घालील किंवा त्या सूचीतील नावे वगळील.

*(४) निवासस्थानांचे क्षेत्र विचारात घेऊन अध्यक्षांच्या मान्यतेनुसार बंदर विश्वस्तमंडळाचा मुख्य अभियंता निवासस्थानाचा प्रकार निश्चित करील.

(५) वर्ग तीन-क प्रकारच्या निवासस्थानासाठी पात्र असणा-या वर्ग तीनच्या कर्मचा-याला, त्याच्या अग्रक्रम दिनांकाच्या आधारे सुरुवातीला एक खोली व स्वयंपाकगृह असलेले वर्ग तीन-क प्रकारचे निवासस्थान वाटप करण्यात येईल, अशा कर्मचा-याला वर्ग तीन-क प्रकारच्या निवासस्थानाच्या वाटपासाठी त्याच्या अग्रक्रम दिनांकाच्या आधारे, त्याच्या/तिच्या इच्छेच्या अधीन राहून आणि तसेच, अशा निवासस्थानांच्या उपलब्धतेच्या अधीन राहून, दोन खोल्या अधिक स्वयंपाकगृह असणा-या निवासस्थानात स्थलांतरित करण्यात येईल.

---

* बी.पी.टी. कर्मचारी (निवासस्थानांचे नियत वाटप व ताबा) विनियम, १९७५ दिनांक (२८.४.१९९३ चा टी.आर.क्र.२४९ तसेच दि.१६.९.१९९४ रोजीच्या भारताच्या राजपत्रात जीएसआर ६९२(ई) म्हणून प्रकाशित केलेल्या एमओएसटी च्या मंजूरीने सुधारित.)

६. वर्ग चार, तीन-क, तीन-भ व तीन-अ प्रकारच्या निवासस्थानांचे वाटप-

(१) प्रशासन प्राधिकारी, विभाग प्रमुखांकडून आवश्यक ती माहिती प्राप्त केल्या नंतर प्रत्येक प्रकारच्या निवासस्थानाच्या प्रारंभिक वाटपासाठी पात्र असलेल्या कर्मचा-यांची वरील विनियम ३ (एफ) (एक) व ३(एफ)(२) यांमध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या संबंधीत प्राधान्य दिनांकाच्या लावलेली एक अद्ययावत सूची ठेवील.

(२) प्रशासकीय प्राधिकारी, ज्या दिनांकास निवासस्थानाने रिक्त होणार असतील त्या दिनांकाच्या काही दिवस अगोदर ज्या कर्मचा-यांना त्यांच्या अग्रक्रम दिनांकाच्या आधारे, निवासस्थाने वाटप केले जाण्याची शक्यता असेल त्या कर्मचा-यांना निवासस्थानांचे वाटप झाल्यास, असे वाटप स्वीकारण्याची त्यांची इच्छा आहे किंवा नाही याबाबत, प्राधिकारी विहित करील अशा मुदतीच्या आत लेखी कळविण्यास भाग पाडील.

(३) [१][वरील खंड (१) आणि (२) यांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे, ज्याला निवासस्थान वाटप झाले असेल अशा कोणताही कर्मचारी, वाटप पत्र मिळाल्याच्या दिनांकापासून पाच दिवसांच्या आत वाटप स्वीकारण्यात कसूर करील किंवा पंधरा दिवसांच्या आत निवासस्थानाचा ताबा घेण्यात कसूर करील तर, तो त्या वाटप पत्राच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीकरिता दुस-या वाटपासाठी पात्र ठरणार नाही.]

---

१ दिनांक १६.२.१९९९ चे नौकानयन व परिवहन मंत्रालयाचे पत्र क्र.११-११०११/९४-पीईआय याद्वारे दाखल करण्यात आला.

**(४) जो कर्मचारी अगोदरच निवासस्थानात राहत असेल आणि तो, पदोन्नतीमुळे किंवा अन्य प्रकारे त्याच्या वेतनात वाढ झाल्यामुळे विनियम ५ अन्वये ज्या उच्चतम प्रकारच्या निवासस्थानाच्या वाटपासाठी पात्र असेल त्या उच्चतम प्रकारच्या निवासस्थानाचे वाटप करण्याची मागणी करीत असेल, व अशा कोणत्याही कर्मचा-याला कोणत्याही वेळी प्रशासन प्राधिका-याकडे अर्ज करता येईल. प्रशासकीय प्राधिकारी, अशा प्रकारे प्राप्त झालेल्या अर्जाच्या आधारे बीपीटी निवास्थानांमध्ये राहणारे आणि उच्चतम प्रकारचे निवासस्थान वाटपाची मागणी करणारे कर्मचारी, ज्या दिनांकास अशा उच्चतम प्रकारच्या निवासस्थानासाठी पात्र ठरले असतील त्या दिनांकावर आधारित वरिष्ठता क्रमानुसार लावलेली त्यांची एक अद्ययावत सूची ठेवील. वर्ग तीन-क, वर्ग तीन-ब मध्ये व आणि वर्ग तीन-अ प्रकाराच्या निवास्थानांचे प्रारंभिक वाटप आणि वर्ग चार मधून वर्ग तीन-क मधून वर्ग तीन-ब मध्ये आणि वर्ग तीन-ब मधून वर्ग तीन-अ मध्ये होणारे स्थलांतर खंड ३ (च)(दोन) मध्ये व्याख्या केलेल्या प्राधान्य दिनांकानुसार करण्यात येईल. दोन किंवा अधिक कर्मचा-यांचा प्राधान्य दिनांक एकच असेल तेव्हा वरिष्ठता ठरविण्यासाठी खंड ३ च (एक) मध्ये नमूद केलेले इतर निकष लागू करण्यात येतील.

**(५) या विनियमांमध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त एखादा कर्मचा-याला, वरील खंड ६(१) व खंड ६(४) मध्ये नमूद केलेल्या प्राधान्य दिनांकाच्या आधारे त्याच्या पात्रतेस अनुरूप अशा प्रकारच्या निवासस्थानाचे वाटप करण्यात येईल.

---

** बी.पी.टी. कर्मचारी (निवासस्थानांचे नियत वाटप व ताबा) विनियम, १९७५ (दिनांक २८.४.१९९३ चा टी.आर.क्र.२४९ तसेच दि.१६.९.१९९४ रोजीच्या भारताच्या राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या जीएसआर ६९२(ई) म्हणून प्रसिद्ध केलेल्या नौकनयन व परिवहन मंत्रालयाच्या मंजूरीद्वारे सुधारित)

(६) (क) वरील खंड (१) ते (५) या मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्यांच्या कामाच्या वेळा निश्चित नसतात किंवा जेथे कामाच्या वेळा सलग नसतात

तेथे ज्यांना खंडित वेळेत काम करावे लागते तथापि, ज्यांना आपल्या कामाच्या वेळेखेरीज इतर निकडीच्या प्रसंगीही बोलावले जाते किंवा सेवेच्या निकडीनुसार बंदर विश्वस्त मंडळाच्या निवासस्थानांमध्ये ज्यांना घर देण्याची आवश्यकता आहे अशा कर्मचा-यांच्या घरासाठी निवासस्थानांचा एक विशेष संकोष राखून ठेवण्यात येईल.

(ख) या संकोषात समाविष्ट केलेल्या निवासस्थानांची संख्या, प्रकार व ठिकाण आणि त्यांच्या वाटपासाठी पात्र असलेले प्रवर्ग जोडपत्र-दोन मध्ये दर्शविल्याप्रमाणे असतील. या संकोषात करावयाची कोणतीही वाढ आणि किंवा त्यात करावयाची कपात ही अध्यक्षाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल.

(ग) विशेष संकोषात समाविष्ट असलेले निवासस्थान रिक्त झाल्यावर ते, प्रशासन प्राधिकारी त्याकरिता पात्र असलेल्या एखाद्या कर्मचा-याला ज्या विभागात तो कर्मचारी कार्यरत असेल त्या विभागाच्या प्रमुखांच्या शिफारसीवरून वाटप करील.

(घ) एखाद्या कर्मचा-याने, त्याच्या पदोन्नतीच्या किंवा अन्य प्रकारचे निवासस्थान धारण केले जाण्यासाठी तो पात्र ठरल्याने, अशा अन्य प्रकारच्या निवासस्थानात स्थलांतरित झाल्याच्या कारणास्तव, विशेष संकोषात समाविष्ट केलेल्या निवासस्थानात राहण्यचे बंद केले असेल तर, तो आपल्या ताब्यात असलेले निवासस्थान प्रशासन प्राधिकारी निश्चित करील अशा मुदतीच्या आत परत करील. तथापि, अशा एखाद्या कर्मचा-याला, शक्य तितक्या लवकर आणि प्राधान्य तत्वावर, परंतु विशेष संकोषात समाविष्ट नसलेले, परंतु जे त्याच्या ताब्यात होते अशा प्रकारचे निवासस्थान वाटप करण्यात येईल.

(७) निलंबनाधीन असलेला कर्मचारी त्याच्या निलंबनाच्या कालावधीत निवासस्थानाच्या वाटपासाठी पात्र ठरणार नाही.

६ क. विनियम ६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जोडपत्र एक मध्ये प्रकार चार खालील अनुक्रमांक १, २, ४, ५, ७, १० ते १३ व १७ ते २९, प्रकार तीन-क खालील अनुक्रमांक १ ते ८, प्रकार तीन-ब खालील अनुक्रमांक १, २, ३(केवळ जूनी ४०२ युनिटे) आणि अनुक्रमांक ५ ते १२ आणि प्रकार तीन-अ खालील अनुक्रमांक १ ते ६ दर्शविलेल्या इमारतील, ३१ डिसेंबर १९७५ पर्यंत रिक्त होणा-या निवासस्थानांचे वाटप, हे विनियम प्रसिद्ध करण्यापूर्वी अंमलात असलेल्या नियमांन्वये किंवा आदेशान्वये ठेवण्यात आलेल्या प्रतिक्षा नोंदवहीच्या आधारे करण्यात येईल.

७. अधिकरी श्रेणीच्या निवासस्थानांचे वाटप: मुंबई बंदर सागरी सेवा चौकशी समिति, १९६७ किंवा मुख्य बंदर (वर्ग एक व वर्ग दोन सागरी सेवेतर) वेतन समिती, १९७२ च्या शिफारशींच्या अंमलबजावणीमध्ये लागू केलेल्या वेतनश्रेणीवरील कर्मचा-याला, विनियम ५ अन्वये तो, ज्या निवासस्थानासाठी पात्र असेल, ते निवासस्थान, रिक्त झाल्यावर,

अध्यक्षांकडून किंवा त्याने नामनिर्देशित केलेल्या इतर अधिका-याकडून वाटप करण्यात येईल.

८. क्रमबाह्य नियतवाटप:(१) ज्याला निवासस्थानाचे वाटप करण्यात आले आहे असा कर्मचारी सेवेत असताना मरण पावला असेल तेव्हा त्याच्या पत्नीला क्रमबाह्य तत्वावर निवासस्थानाचे वाटप करता येईल, परंतु, ती बंदर विश्वस्तमंडळाच्या सेवेत असावी आणि मृत कर्मचा-यासोबत ती त्याच्या मृत्युच्या दिनांकापूर्वी किमान सहा महिने इतक्या कालावधीसाठी निवासस्थानात एकत्र राहिलेली असावी. जर कर्मचा-याची पत्नी, मृत कर्मचा-याला वाटप केलेल्या निवासस्थानाच्या प्रकारासाठी पात्र असेल तर तेच निवासस्थान तिच्या नावाने नियमित करता येईल. अन्यथा, ती हक्कदार असलेल्या प्रकाराचे निवासस्थान तिला शक्य तितक्या लवकर वाटप करता येईल.

(२) इतर कोणत्याही विनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अध्यक्षास विशेष प्रकरणी आणि कारणे लेखी नमूद करून क्रमबाह्य वाटप तत्वावर बंदर विश्वस्तमंडळाच्या कोणत्याही कर्मचा-याला कोणत्याही निवासस्थानाचे वाटप करता येईल.

९. संयुक्त वाटप:(१)जे अविवाहित असतील किंवा मुंबईमध्ये संपूर्ण कुटुंबीय त्यांच्या सोबत राहत नसतील अशा एकापेक्षा अधिक सर्व कर्मचा-यांना पुढील मर्यादेच्या अधीन राहून एका निवासस्थानाचे वाटप करता येईल:

| | | |
|---|---|---|
| एक खोली असलेल्या निवासस्थानात | - | जास्तीत जास्त दोन कर्मचारी |
| दोन खोल्या असलेल्या निवासस्थानात | - | जास्तीत जास्त तीन कर्मचारी |
| तीन खोल्या असलेल्या निवासस्थानात | - | जास्तीत जास्त पाच कर्मचारी |

अशा प्रकरणातील वाटप, अशा सर्व कर्मचा-यांच्या नावाने संयुक्तपणे करण्यात यावे. हे वाटप करण्यापूर्वी आधीचे सर्व वाटप रद्द करण्यात येतील.

(२) दुस-या किंवा इतर व्यक्तीबरोबर संयुक्तपणे निवासस्थानाचे ज्यांना वाटप करण्यात आले आहे अशा कोणत्याही कर्मचा-याला, प्रशासन प्राधिका-याच्या पूर्व परवानगीशिवाय अशा निवासस्थानात त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याला राहण्याची परवानगी नसेल.

१०. निवासस्थानाचे वाटप किंवा वाटपाचा प्रस्ताव न स्वीकारणे किंवा निवासस्थान स्वीकृत केल्यानंतर निवासस्थान ताब्यात घेण्यात कसूर करणे:-

(१) ज्याला कोणत्याही निवासस्थानाचे वाटप करण्यात आले आहे अशा कर्मचा-याला त्याला वाटप आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत त्या निवासस्थानाचा ताबा घेता घेईल, तसे न केल्यास निवासस्थान ताबा घेण्याचा हक्क गमावण्यास तो पात्र ठरेल परंतु, तथापि, कर्मचा-याच्या गुणावगुणांनुसार कोणत्याही विशिष्ट प्रकरणांत गुणवत्तेनुसार वरील कालावधी वाढवून देणे प्रशासन प्राधिका-यासाठी कायदेशीर असेल आणि कर्मचारी अशा वाढविलेल्या कालावधीत निवासस्थानाचा ताबा मिळण्यास हक्कदार असेल.

परंतु, आणखी असे की, या खंडा अन्वये, निवासस्थानाचा ताबा घेण्याचा आपला हक्क गमावील असा कर्मचारी, अध्यक्ष सर्वसाधारण किंवा विशेष

आदेशाद्वारे निर्धारित करील अशा कालावधीसाठी दुस-या वाटपाकरिता पात्र असणार नाही.

(२) जो कर्मचारी त्याला वाटप झालेल्या निवासस्थानाचा ताबा घेण्यास नकार देईल किंवा निवासस्थानाचा ताबा घेण्यात कसूर करील अशा कोणत्याही कर्मचा-यावर ज्या दिवशी त्याने निवासस्थानाचा ताबा घ्यायला पाहिजे होता त्या दिवसापासून त्याने अशा निवासस्थानाचा ताबा घेतला असता तर तो ज्या दराने भाडे देण्यास पात्र ठरला असता त्या दराने, आणि जोपर्यंत निवासस्थान रिक्त राहील तोपर्यंतच्या कालावधीसाठी परंतु कोणत्याही बाबतीत जास्तीत जास्त एक महिन्याच्या कालावधीसाठी भाडे आकारण्यात येईल. परंतु, एखादा जो कर्मचारी एकतर स्वत:चा किंवा त्याच्या कुटुंबातील एखादया सदस्याच्या आजारपणाच्या कारणामुळे किंवा प्रशासन प्राधिकारी मान्य करील अशा योग्य व पुरेशा असलेल्या एखादया अन्य कारणामुळे त्याला वाटप झालेल्या निवासस्थानाचा ताबा घेण्यास असमर्थ असेल अशा कर्मचा-याला असे भाडे देण्यापासून सूट देण्यात येईल.

११. भाडयाशी संबंधित तरतूदी:

(१) जेव्हा निवासस्थानाचे वाटप स्वीकारण्यात आले असेल तेव्हा भाडयाचे दायित्व असा ताबा घेतल्याच्या दिनांकापासून किंवा त्याला वाटपआदेश मिळाल्याच्या दिनांकापासून चौदा दिवस, किंवा त्याला वाटपआदेश मिळाल्याच्या दिनांकापासून चौदा दिवसानंतर विनियम १० अन्वये प्रशासन प्राधिकारी अनुसंमत करील असा वाढीव कालावधि दिनांकापासून चौदा दिवसांपेक्षा जास्त वाढविला असल्यास यांपैकी जो अगोदरचा कालावधी असेल तेव्हापासून सुरूहोईल. भाडे शक्यतो निवासस्थान वाटप झालेल्या कर्मचा-याच्या वेतनपटामधून कापण्यात येईल. इतर प्रकरणांमध्ये भाडे, विहित केलेल्या दिनांकास निवासस्थान वाटप झालेल्या कर्मचा-या(-यां)कडून रोखीने देण्यात येईल आणि ज्याच्याकडे एक महिन्यांपेक्षा अधिक कालावधीची थकबाकी राहील असा कोणताही कर्मचारी त्याला वाटप झालेले निवासस्थान ताब्यात घेण्याचा आपला हक्क गमावील.

(२) ज्याच्याकडे एखाद्या निवासस्थानाचा ताबा आहे अशा एखाद्या कर्मचा-याला दुस-या निवासस्थानाचे वाटप झाले असेल त्याबाबतीत पूर्वीच्या निवासस्थानाचे वाटप नवीन निवासस्थानाच्या वाटपाच्या दिनांकापासून रद्द झाल्याचे मानन्यात येईल. तथापि, त्यास त्या दिवसांकरिता आणि सामान हलविण्यासाठी नंतरच्या दोन दिवसांकरिता भाडे न देता पूर्वीचे निवासस्थान ठेवून घेता येईल.

(३) निवासस्थान वाटप झालेला कर्मचारी त्याच्या ताब्यात असलेल्या मंडळाच्या मालमत्तेच्या हानीसाठी किंवा नुकसानीसाठी जबाबदार असेल आणि तो प्रशासन प्राधिका-याच्या मते झालेली हानी किंवा नुकसान भरून काढण्यासाठी आवश्यक असेल असा आकार त्या कारणास्तव मंडळाला प्रदान करील.

१२. (क) जेव्हा नियतवाटप प्रत्येक कर्मचा-याला निवासस्थानाचे वाटप झालेले असेल आणि निवासस्थाने एकत्रीतपणे वापरली जात नसतील तेव्हा ज्यांना निवासस्थानांचे वाटप झालेले असेल असे सर्व कर्मचारी उप-खंड (ख), (ग) आणि (घ) यांमध्ये तरतूद

केल्याप्रमाणे भाडे प्रदान करतील जेथे निवासस्थान एकत्रपणे वापरले गेले किंवा निवासस्थानाचे संयुक्त वाटप केले असेल त्याबाबतीत भाडे, विनियम १३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल. कर्मचारी त्यांच्या वैयक्तिक निवासस्थानात वापरलेल्या विजेचा आकार देखील प्रदान करतील मात्र, ते निवासस्थानाबाबत मंडळाकडून देय असलेले नगरपालिका व इतर कर किंवा निवासस्थानासाठी पुरवलेला पाणीपुरवठा, साफसफाई, सामाईक दिवाबत्ती, विद्युत उदवाहन इत्यादीसाठी वापरलेली वीज यांसारख्या इतर विनिर्दिष्ट सेवांसंबंधातील भरपाई देण्यास पात्र नसतील. परंतु, ज्या कर्मचा-यांकडे भाडेमाफ तत्वावर निवासस्थानांचा ताबा असेल असे कर्मचारी आणि सेवेची शर्त म्हणून ज्या पदांना भाडेमाफ निवासस्थाने जोडलेली असतील अशा पदांचे धारक जो पर्यंत अशा निवासस्थानांमध्ये राहतील आणि किंवा जोपर्यंत संबंधित सेवा शर्त लागू असेल तोपर्यंत ते अशा सवलतीचा उपभोग त्यांच्याकडे घेत राहतील.

(टी.आर. क्रमांक ३४०, दि.८.११.१९७७ अन्वये मंजूर आणि भारताचे राजपत्र, भाग दोन, विभाग ३, उपविभाग (एक) दि.९.३.१९७८ रोजी प्रसिध्द, जीएसआर क्रमांक १६३ (ई) दि.४.९.१९७५ पासून अमलात, यात प्रसिध्द केलेली नौकानयन व परिवहन मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक पीईबी - ८५/७७, दि.७.३.१९७८ अन्वये सरकारकडून मंजूर)

(ख) मुंबई बंदर सागरी सेवा चौकशी समिती, १९७२ यांच्या शिफारशींच्या अंमलबजावणीमध्ये लागू केलेल्या वेतन श्रेणीवरील कर्मचारी असेल तर भाडे वसुलीचा दर त्याच्या वित्तलब्धीच्या १० टक्के इतका किंवा, यथास्थिति, मूलभूत नियमांच्या व पूरक नियम यांच्या संकलनाच्या डाक व तार नियम ४५ क अन्वये निर्धारित केल्याप्रमाणे निवासस्थानाच्या प्रमाण भाडे इतका यापैकी जो कमी असेल तितका असेल.

(टी.आर. क्रमांक ३४०, दि.८.११.१९७७ अन्वये मंजूर आणि भारताचे राजपत्र, भाग दोन, विभाग ३, उपविभाग (एक) दि.९.३.१९७८ रोजी प्रसिध्द, जीएसआर क्रमांक १६३(ई) दि.४.९.१९७५ पासून अंमलात, यात प्रसिध्द केलेली नौकानयन व परिवहन मंत्रालयाची अधिसूचना क्र.पीईबी - ८५/७७ दि.७.३.१९७८ अन्वये सरकारकडून मंजूर)

(ग) बंदर व गोदी कामगार वेतन सुधार समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीमध्ये लागू केलेल्या वेतनश्रेणीवरील कर्मचारी असेल तर प्रमाण निवासस्थानाच्या प्रमाण भाडे वसुलीचा दर त्याची दरमहा वित्तलब्धी रूपये ५०० पेक्षा कमी असल्यास, त्याच्या वित्तलब्धीच्या ७ १/७ टक्के इतका असेल आणि त्याची दरमहा वित्तलब्धी ५०० रू किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास, त्याच्या वित्तलब्धीच्या १० टक्के इतका असेल:

परंतु जर कर्मचारी कंत्राटी पध्दतीने काम करणारा गोदी कामगार असल्यास, भाडेवसुलीचा दर त्याच्या किमान वेतनमानाच्या रकमेतून १० टक्के

इतकी सूट वजा करून काढण्यात आलेल्या रकमेच्या ७ १/७ टक्के किंवा यथास्थिति १० टक्के इतका असेल.

टीप - या परंतुकाअन्वये परिगणित करण्यात आलेले भाडे पूर्णांक रूपयांमध्ये असेल.

परंतु आणखी असे की, एखादा कर्मचारी विनियम ५ अन्वये ज्या प्रकारच्या निवासस्थानासाठी हक्कदार असेल त्या प्रकारच्या निवासस्थानाच्या वाटपाचा प्रस्ताव त्याला देऊ केलेला नसेल आणि त्याच्या ताब्यात निम्नतम प्रकारचे निवासस्थान असेल त्याबाबतीत भाडे वसुलीचा दर ज्या वेतन मर्यादिसाठी असे निम्नप्रकारचे निवासस्थान योजलेले असेल त्या कमाल वेतनमर्यादिच्या ७ १/२ टक्के किंवा यथास्थिति १० टक्के इतका असेल:

परंतु तसेच कि एखादा कर्मचारी विनियम ५ अन्वये तो ज्या प्रकारच्या निवासस्थानासाठी हक्कदार असेल त्या प्रकारच्या निवासस्थानाच्या वाटप प्रस्ताव नाकारील आणि निम्नतम प्रकारचे निवासस्थान ताब्यात ठेवण्याचे चालू ठेवील अशा कर्मचा-याला मागील परंतुकामधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(टी. आर. क्रमांक ३४०, दि.८.११.१९७७ अन्वये मंजूर आणि भारताचे राजपत्र, भाग-दोन, विभाग ३, उपविभाग (एक) दि.९.३.१९७८ रोजी प्रसीध्द, जीएसआर क्रमांक १६३ (ई) दि.४.९.१९७५ पासून अंमलात, यात प्रसिध्द केलेली नौकानयन व परिवहन मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक पीईबी-८५/७७, दि.७.३.१९७८ अन्वये सरकारकडून मंजूर)

(घ) बंदर व गोदी कामगार वेतन सुधार समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीमध्ये लागू केलेल्या वेतनश्रेणीवरील कर्मचारी असेल तर दुय्यम दर्जाच्या निवासस्थानाची भाडेवसुली, निवासस्थानाची श्रेणी, पुरवलेल्या सुखसुविधा निवासस्थानाचे स्वरूप व स्थिती आणि असे इतर घटक यांवर अवलंबून असणा-या निवासस्थानाच्या दुय्यम दर्जाची व्याप्ती विचारात घेऊन मंडळ निर्धारित करील अशा, कमी केलेल्या किंवा नाममात्र दराने, करण्यात येईल.

(टी आर क्र.३४० दि.८.११.१९७७ अन्वये मंजूर आणि भारताचे राजपत्र, भाग-दोन, विभाग ३, उपविभाग (एक), दि.९.३.१९७८ रोजी प्रसिध्द, जीएसआर क्रमांक १६३(ई) दि.४.९.१९७५ पासून अंमलात यात प्रसिध्द केलेली नौकानयन व परिवहन मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक पीईबी - ८५/७७ दि.७.३.१९७८ अन्वये सरकारकडून मंजूर)

(ड) मंडळाच्या भाडे वसुलीच्या दरांत कोणत्याही वेळी सुधारणा करण्याचा अधिकार राखून ठेवील.

१३. प्रशासन प्राधिका-याने निवासस्थानांत एकत्र राहण्याची अनुमती दिली असेल किंवा निवासस्थानांचे संयुक्तपणे वाटप केले असेल तेव्हा अशा निवासस्थानांचे भाडे वसुली पुढीलप्रमाणे करण्यात येईल:

(क) मुंबई बंदर सागरी सेवा चौकशी समिती १९६७ किंवा मुख्य बंदर (वर्ग एक व दोन सागरेतर सेवा) वेतन समिती १९७२ याच्या शिफारशींच्या अंमलबजावणीमध्ये लागू केलेल्या वेतन श्रेणीवरील कर्मचा-यांच्या बाबतीत, जेव्हा अशा दोन किंवा अधिक कर्मचा-यांना एकाच निवासस्थानात एकत्र राहण्याची अनुमती दिली असेल तेव्हा त्यांच्या मधील जे कर्मचारी उच्चतर/उच्चतम वित्तलब्धी घेत असतील त्या कर्मचा-यांच्या वित्तलब्धीच्या १० टक्के इतकी रक्कम किंवा यथास्थिति, प्रमाण भाडे यापैकी जी कमी असेल तेवढी रक्कम ते आपल्यामधून भाडे म्हणून बंदर विश्वस्त मंडळाला प्रदान करतील.

(टी. आर. क्र.३४०, दिनांक ८.११.१९७७ अन्वये मंजुर आणि भारताचे राजपत्र, भाग-दोन, विभाग ३, उपविभाग (एक) दि.९.३.१९७८ रोजी प्रसिध्द, जीएसआर क्रमांक १६३(ई) दि.४.९.१९७५ पासून अंमलात, यात प्रसिध्द केलेली नौकानयन व परिवहन मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक पीईबी ८५/७७, दि.७.३.१९७८ अन्वये सरकारकडून मंजूर)

(ख) बंदर व गोदी कामगार वेतन सुधार समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीमध्ये लागू केलेल्या वेतनश्रेणी वरील कर्मचा-यांच्या बाबतीत -

(एक) दोन किंवा अधिक कर्मचा-यांना एकाच निवासस्थानात एकत्र राहण्याची अनुमती दिलेली असेल तेव्हा, नियतभागी निवासस्थान वाटप झालेला कर्मचारी, जर तो भाडेमाफ निवासस्थानास हक्कदार नसेल तर विनियम १२ च्या उपखंड (ग) किंवा, यथास्थिति, (घ) अन्वये तो देय असल्याप्रमाणे भाडे प्रदान करील आणि निवासस्थान वाटप झालेला असा कर्मचारी सहनिवासी कर्मचा-याकडून किंवा कर्मचा-यांकडून प्रमाणशीर हिश्श्याचे भाडे वसूल करण्याची व्यवस्था करील;

(दोन) जेव्हा दोन किंवा अधिक कर्मचा-यांना एकाच निवासस्थानाचे संयुक्तपणे वाटप केले असेल तेव्हा ते कर्मचारी त्यांच्यामध्ये जे कर्मचारी उच्चतर किंवा उच्चतम वित्तलब्धी घेत असतील अशा कर्मचा-यांच्या वित्तलब्धीच्या १० टक्के किंवा यथास्थिति, ७ १/२ टक्के (किंवा जर निवासस्थान दुय्यम दर्जाचे असेल तर विनियम १२ च्या खंड (घ) अन्वये मंडळ निश्चित करील अशा कमी टक्केवारीने करून) भाडे त्यांच्या आपसातून प्रदान करतील, अशा प्रकरणात, अशा प्रत्येक कर्मचा-याने देय असलेले प्रमाणशीर भाडे, निवासस्थानाच्या क्षेत्रापैकी त्याने निवासस्थानाच्या जेवढया क्षेत्राचा ताबा घेतला असेल त्या प्रमाणात असेल.

(टी.आर.क्र. ३४०, दिनांक ८.११.१९७७ अन्वये मंजूर आणि भारताचे राजपत्र, भाग-दोन विभाग-३, उपविभाग (एक) दि.९.३.१९७८ रोजी प्रसिध्द जीएसआर क्रमांक १६३ (ई) दि.४.९.१९७५ पासून अंमलात, यात प्रसिध्द केलेली नौकानयन व परिवहन मंत्रालयाशी अधिसूचना क्रमांक पीईबी-८५/७७ दि.७.३.१९७८ अन्वये सरकारकडून मंजूर)

14. भाडेमुक्त निवासस्थानात राहणा-या व्यक्ती कोणत्याही प्रकारच्या रजेवर (नैमित्तिक रजेव्यतिरिक्त) असताना निवासस्थानास हक्कदार नसतील परंतु, संबंधित विभाग प्रमुखाला त्याच्या स्वेच्छाधिकारात चार महिन्यांहून अधिक नसलेल्या रजा कालावधीत भोगवटादाराला निवासस्थान धारण करण्याची अनुमती देता येईल मात्र, ही निवासस्थाने बदली दाखल झालेल्या कर्मचा-यासाठी आवश्यक नसतील आणि विभागाच्या कामकाजाची यामुळे असुविधा होणार नाही.

15. निवासस्थानातील भोगवटादारांना निवासस्थानाशी संलग्न असलेल्या बागेच्या देखरेखीकरिता अतिरिक्त आकार किंवा भाडे प्रदान करण्यापासून सूट दिली आहे.

16. घरभाडे भत्ता:

(एक) ज्याला निवासस्थानाचे वाटप झालेले आहे अशा कर्मचा-याला कोणताही घरभाडे भत्ता दिला जाणार नाही.

परंतु जेव्हा निवासस्थानात एकत्र राहण्याची अनुमती दिली असेल आणि निवासस्थान वाटप झालेल्या कर्मचा-याने त्या निवासस्थानाचे भाडे देणे अपेक्षित असेल तेव्हा निवासस्थान वाटप झालेला असा कर्मचारी वगळता इतर सह निवासी कर्मचारी हा/हे मुंबई बंदर सागरी सेवा चौकशी समिती, १९६७ किंवा मुख्य बंदर (वर्ग एक व वर्ग दोन सागरेतर सेवा) वेतन समिती, १९७२ यांच्या शिफारशींच्या अंमलबजावणी मध्ये लागू केलेल्या वेतनश्रेणीवरील कर्मचारी असेल/असतील तर, अशा सहनिवासी कर्मचा-याला/कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेला घर भाडे भत्ता देता येईल. तथापि, जर निवासस्थान वाटप झालेला कर्मचारी हा भाडे माफ तत्वावर निवासस्थानात राहात असेल तर, सहनिवासी कर्मचारी घरभाडे भत्ता मिळण्यास हक्कदार नसतील.

(टी आर क्रमांक ३४० दि. ८.११.१९७७ अन्वये मंजूर आणि भारताचे राजपत्र, भाग-दोन, विभाग ३, उप-विभाग (एक) दि. ९.३.१९७८ रोजी प्रसिध्द जी एस आर क्र.१६३(ई) पासून अंमलात यात प्रसिध्द केलेली नौकानयन व परिवहन मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक पीईबी - ८५/७७ दि. ७.३.१९७८ अन्वये सरकारकडून मंजूर).

(दोन) जो, मुख्य बंदर (वर्ग एक व वर्ग दोन सागरेतर सेवा) वेतन समिती १९७२ च्या शिफारशींच्या अंमलबजावणीमध्ये लागू केलेल्या वेतनश्रेणीवरील कर्मचारी असेल, आणि जो बंदर विश्वस्तमंडळाच्या भाडेमाफ निवासस्थानासाठी पात्र असेल असा कर्मचारी त्याला वाटप झालेल्या निवासस्थानाचा ताबा घेण्यास नकार देईल किंवा तो ताबा घेण्यात कसूर करील तर ज्या दिवशी त्याने निवासस्थानाचा ताबा घ्यायला पाहिजे होता त्या दिवसापासून आणि जो पर्यंत निवासस्थान रिक्त राहील तोपर्यंत घरभाडे भत्त्यासाठी तो पात्र ठरणार नाही. त्यानंतर तो कर्मचारी सर्वसाधारण दराने आणि भाडे माफ निवासस्थानाऐवजीच्या मान्य केलेल्या उच्चदराने नव्हे तर सर्वसाधारण दराने घरभाडे भत्ता मिळण्यास पात्र ठरेल.

टीप: ज्या प्रकारच्या निवासस्थानाकरिता तो कर्मचारी पात्र असेल त्या निवासस्थानाव्यतिरिक्त इतर प्रकारचे निवासस्थान ताब्यात होण्यास दिलेला नकार हा वरील खंड (२) च्या प्रयोजनार्थ ‘नकार’ नसेल.

17. निवासस्थान पोटभाडयाने किंवा निवासस्थानात इतरांची रहाण्याची सोय करणे -

निवासस्थान वाटप झालेली कोणतीही व्यक्ती तिच्या निवासस्थानाचा कोणताही भाग पोटभाडयाने किंवा भाडयाने देणार नाही किंवा निवासस्थानात इतर निवासींची राहण्याची सोय करणार नाही किंवा त्याच्या निवासस्थानात प्रासंगिक पाहुण्याव्यतिरिक्त कोणत्याही बाहेरच्या व्यक्तीला राहू देणार नाही. तथापि, प्रशासन प्राधिकारी एखाद्या कर्मचा-याला तो विहित करील अशा अटीं व निर्बंधावर विनिर्दिष्ट कालावधीसाठी बंदर विश्वस्त मंडळाच्या अन्य कर्मचा-याला त्या निवासस्थानात राहू देण्यासाठी निवासस्थान कर्मचा-याला विभागून परवानगी देता येईल. निवासस्थानात राहणारा असा अन्य कर्मचारी, ज्या कालावधीसाठी परवानगी देण्यात आली असेल तो कालावधी संपल्यावर आणि कोणत्याही परिस्थितीत निवासस्थान वाटप झालेला कर्मचारी निवासस्थान रिक्त करण्यापूर्वी निवासस्थान सोडील.

18. <u>निवासस्थानांची परस्परसहमतीने अदलाबदली</u>- ज्यांना या विनियमांन्वये एकाच प्रकारचे आणि एकाच क्षेत्रफळाचे निवासस्थानांचे वाटप करण्यात आले असेल अशा कर्मचा-यांना प्रशासन प्राधिका-याच्या पूर्व परवानगीने त्यांच्या निवासस्थानांची अदलाबदली करता येईल.

19. <u>वाटप प्रत्यार्प्रित करणे आणि नोटीशीचा कालावधी:</u> एखाद्या कर्मचा-याला, प्रशासन प्राधिका-याला किंवा या प्रयोजनाकरिता अध्यक्षाने नियुक्त केलेल्या इतर अधिका-याला किंवा अधिका-यांना निवासस्थान रिक्त करण्याच्या दिनांकाच्या तीस दिवस आधी मिळेल अशाप्रकारे सूचना देऊन निवासस्थानाचे वाटप कोणत्याही वेळी प्रत्यार्पित करता येईल. ज्या दिनांकास प्रशासन प्राधिका-याला किंवा संबंधित इतर अधिका-याला किंवा अधिका-यांना त्या पत्रामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास यांपैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकानंतर एकतीसाव्या दिवसापासून निवासस्थानाचे वाटप रद्द करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल. कर्मचा-याने यथोचित सूचना न दिल्यास, तो तीस दिवसांचे किंवा तीस दिवसांपेक्षा कमी असलेले जेवढे दिवस सूचना देण्यात कसूर केली असेल तेवढया दिवसांचे भाडे देण्यास जबाबदार असेल. परंतु, प्रशासन प्राधिका-यास किंवा इतर संबंधित अधिका-यास किंवा अधिका-यांना अल्प कालावधीची सूचना स्वीकारता येईल.

२०. <u>स्वच्छता आणि देखभाल -</u>

(१) निवासस्थानचे वाटप झालेला कर्मचारी, प्रशासन अधिका-याचे समाधान होईल अशाप्रकारे निवासस्थान स्वच्छ स्थितीत ठेवील. भिंती शेणाने सारवण्यात येणार नाहीत. भिंतीवर कोणत्याही खिळण्या बसविणार नाही किंवा लाकडीकाम करण्यात येणार नाही किंवा पूर्वपरवानगीशिवाय खिडक्यांवर व व-हांडयावर कोणत्याही जाळ्या किंवा पडव्या उभारण्यात येणार नाहीत. कोणत्याही विद्यमान खिळण्या काढून टाकता येणार नाहीत. निवासस्थान वाटप झालेल्या कर्मचा-यास पूर्व परवानगीशिवाय निवासस्थानाच्या आतून किंवा बाहेरून सफेदी किंवा रंगकाम करता येणार नाही.

(२) निवासस्थान वाटप झालेल्या कर्मचा-याला कोणत्याही निवासस्थानाशी संबंध्द किंवा परिवास्तूमधील कोणत्याही ठिकाणी कोणतेही अनधिकृत बांधकाम उभारता येणार नाही.

(३) सर्व केरकचरा कचरापेटीत आणि या प्रयोजनार्थ पुरवलेल्या पात्रात टाकण्यात येईल. पुरवलेल्या पात्राव्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी कोणताही केरकचरा आढळून आल्यास, निवासस्थान वाटप झालेल्या ज्या कर्मचा-याच्या किंवा

कर्मचा-यांच्या निवासस्थानाजवळ तो कचरा आढळून येईल त्यांना त्याबद्दल जबाबदार धरण्यात येईल.

(४) इमारतींचा परिसर स्वच्छ आणि नीटनेटक्या स्थितीत ठेवण्यात येईल. जवळच्या निवासस्थानाच्या वाटपधारकास त्याबाबत जबाबदार धरण्यात येईल.

(५) निवासस्थान वाटपधारक, त्यांचे कुटुंबीय व त्याच्यावरील अवलंबून असलेल्या व्यक्ती सर्वसाधारणपणे आपआपल्या निवासस्थानांना नेमून दिलेल्या पाण्याच्या नळाचा संडासाचा वापर करतील.

(६) न्हाणीघरांचा शौचालये किंवा मुत्री म्हणून वापर केला जाणार नाही. वाटपधारक आपली मुले त्या परिसरात कोठेही कोणताही उपद्रव करणार नाहीत याकडेही लक्ष देतील.

(७) निवासस्थानाच्या तळभागावर किंवा भिंतीवर तसेच परिसराच्या प्रसीममध्ये थुंकण्यास मनाई आहे.

(८) भांडी त्यासाठी बांधलेल्या धुण्याच्या जागीच किंवा न्हाणीघरामध्ये धुण्यात येतील या किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी खड्डा खोदून माती काढण्यास मनाई आहे.

(९) पाणी, केरकचरा किंवा इतर कोणत्याही वस्तू, खिडकीतून किंवा व-हांडयातून बाहेर फेकण्यात येणार नाही.

(१०) वाटपधारक इतर रहिवाशांना उपद्रव किंवा त्रास होईल अशाप्रकारे निवासस्थानाचा वापर करणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे निवासस्थान वापरणा-यांना बदलता येणार नाही.

(११) (क) प्रशासकीय प्राधिकरणाची स्पष्ट परवानगी घेतल्याशिवाय निवासस्थानामध्ये किंवा त्यांच्या लगतच्या जागेत कोणताही प्राणी किंवा पक्षी किंवा वाहन ठेवता येणार नाही. असा प्राणी किंवा पक्षी किंवा वाहन यामुळे इतर रहिवाशांना उपद्रव होतो किंवा त्यामुळे आजूबाजूचा परिसर अस्वच्छ किंवा गलिच्छ होतो असे दिसून आल्यास कोणतीही सूचना न देता कोणत्याही वेळी अशी परवानगी मागे घेतली जाण्यास पात्र ठरेल.

(ख) कोणताही भोगवटादार प्रशासकीय प्राधिकरणाकडून लेखी पूर्व परवानगी घेतल्याशिवाय त्याच्या ताब्यातील जागेमध्ये किंवा तिच्या लगतच्या पोर्ट ट्रस्टच्या कोणत्याही जागेमध्ये कोणत्याही प्राण्याची कत्तल करणार नाही किंवा त्याची हत्या करणार नाही.

टीप: या विनियमांमुळे निवसस्थानात कोंबडया व इतर पक्षी मारण्यास प्रतिबंध होणार नाही.

(१२) वाटपधारक इमारतीच्या कोणत्याही भागाचे नुकसान झालेले नाही याची नेहमी सुनिश्चिती करील.

(१३) इमारतीचा कोणताही भाग, हातभट्टीची दारु गाळण्यासाठी किंवा जुगारासाठी किंवा कोणत्याही अनैतिक किंवा बेकायदेशीर कृत्यासाठी वापरण्यात येणार नाही.

(१४) निवासस्थानाच्या आतील किंवा बाहेरील किंवा वसतिस्थानात अन्यत्र बंदर विश्वस्तमंडळाच्या कचरा पेटया, पाण्याचे नळ, विद्युत जोडणी, खिळण्या, पाण्याचे नळखांब, कुंपण, मांडण्या, कपडे वाळायला टाकायच्या दो-या इत्यादी किंवा इतर कोणत्याही मालमत्तेत अनधिकृत फेरफार नुकसान किंवा ते काढून घेता येणार नाही.

(१५) कोणताही भाडेकरू प्रशासन प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीशिवाय, नगरपालिकेच्या किंवा बंदर विश्वस्त मंडळाच्या जलवाहिन्यांवरून विद्युत नळ बसविणार नाही किंवा निवासस्थानांत बसविलेल्या विद्युत संचमांडण्यांच्या मंजूर भारापेक्षा जास्त भाराची अतिरिक्त विजेची उपकरणे जोडता येणार नाही.

(१६) कोणतेही प्रवेशद्वार, व-हांडा किंवा खिडकी यांस प्रकाश व हवा येण्यास प्रतिबंध होईल अशा प्रकारे बंद करता येणार नाही.

(१७) शेजा-यांना त्रास होईल अशा प्रकारे रेडिओ किंवा ग्रामोफोन रेकॉर्ड मोठया आवाजात लावता येणार नाही किंवा इतर कोणतेही वाद्य वापरता येणार नाही किंवा कोणताही आवाज करता येणार नाही.

(१८) इमारतींच्या किंवा वसतिस्थानाच्या कोणत्याही भागात भांडण, शारीरिक झटापट इत्यादिंसारखी कोणतीही अशांतता निर्माण केली जाणार नाही.

(१९) पलंग/खाटा ठेवणे किंवा इतर कोणत्याही वस्तू ठेवणे किंवा कोणताही उद्योग किंवा कामकाज चालवणे यांसारख्या खाजगी प्रयोजनांसाठी मोकळ्या जागांचा वापर करता येणार नाही.

(२०) कोणताही वाटपधारक आपल्या निवासस्थानात कोणताही संक्रामक रोग किंवा आजार असलेल्या कोणत्याही व्यक्तीला राहू देणार नाही. ५ दिवसांहून अधिक काळ आजारी असलेल्या प्रत्येक रूग्णाची आणि सर्व संक्रामक आजारांच्या सर्व रूग्णांची तसेच सर्व मृत्यु व जन्म यांची माहिती ताबडतोब कल्याण अधिक्षकाला देण्यात येईल आणि त्याने आणि/किंवा निवासस्थानांचे पर्यवेक्षण करणा-या वैद्यकीय अधिका-याने दिलेल्या आरोग्य व स्वच्छता यांसंबंधीच्या सर्व आदेशांचे तत्परतेने पालन करण्यात येईल.

(२१) कोणतीही संघटनेची सभा किंवा सार्वजनिक सभा, त्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकापासून किमान ७ दिवस अगोदर कल्याण अधिक्षकामार्फत प्राप्त करता येईल अशा प्रशासकीय प्राधिका-याच्या लेखी परवानगीशिवाय वसतिस्थानाच्या प्रसीमेमध्ये आयोजित केला जाणार नाही.

(२२) वाटपधारकाला पाहिजे तितक्या आधी प्राप्त करता येईल अशा प्रशासन प्राधिका-याच्या परवानगीशिवाय निवासस्थानामध्ये किंवा निवासस्थानाच्या आसपास इतर रहिवाशांना त्रास होईल असे संगीत वाजवता येणार नाही किंवा ते वाजविण्यास तो कारणीभूत ठरणार नाही. परवानगीसाठीचे असे सर्व अर्ज प्रशासन प्राधिकरणाकडे किमान ७ दिवस आधी सादर करण्यात येतील.

(२३) कोणताही वाटपधारक ज्याला वसतिस्थानामध्ये आपला व्यवसाय करण्यास प्राधिकृत करण्यात आलेले नाही अशा फेरिवाल्याकडून कोणतीही वस्तू खरेदी करणार नाही.

(२४) वसतिस्थानात कोणत्याही भिका-याला प्रवेश देण्यास व भिक्षा मागण्यास प्रोत्साहन दिले जाणार नाही.

२१. <u>वाटप रद्द करणे</u>

(क) जर मंडळाचा कर्मचारी,

(एक) मरण पावला किंवा तो बंदर विश्वस्त मंडळाच्या सेवेतून निवृत्त झाला किंवा त्याने राजीनामा दिला; किंवा

(दोन) बंदर विश्वस्त मंडळाच्या सेवेतून त्याला बडतर्फ किंवा काढून टाकले किंवा त्याची कपात केली, किंवा;

(तीन) तो निवृत्तिपूर्व रजेवर गेला; किंवा

(चार) प्रशासकीय प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीशिवाय त्याने कोणत्याही अधिकृत रजेच्या कालावधीखेरीज अन्यथा ३० दिवसांच्या किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीकरिता निवासस्थान ताब्यात ठेवले नाही; किंवा

(पाच) निवासस्थानाचा कोणताही भाग भाडयाने किंवा पोटभाडयाने दिला, किंवा

(सहा) त्यात निवासी ठेवले, किंवा

(सात) निवासस्थानात नैमित्तिक पाहुण्यांव्यतिरिक्त कोणत्याही बाहेरच्या व्यक्तीला राहू देईल, किंवा;

(आठ) संक्रामक आजाराने किंवा रोगाने ग्रस्त असणा-या कोणत्याही व्यक्तीला निवासस्थानात राहू दिले, किंवा;

(नऊ) एका किंवा अधिक कर्मचा-यांसह संयुक्तपणे त्याला निवासस्थानाचे वाटप केलेले असेल तेव्हा त्या निवासस्थानामध्ये त्याने त्याच्या कुटुंबाच्या कोणत्याही सदस्याला राहण्याची परवानगी दिली तर, किंवा

(दहा) या विनियमांपैकी कोणत्याही विनियमाचा भंग केला तर; मंडळास, कोणत्याही वेळी निवासस्थानाचे वाटप रद्द करता येईल.

<u>टीप</u>: या विनियमाच्या खंड(क) अन्वये मंडळाने दिलेला कोणताही आदेश,-

(एक) एखाद्या कर्मचा-याचा मंडळाच्या सेवेत असताना मृत्यू झाला असेल त्याबाबतीत मृत्यूच्या दिनांकापासून सहा महिने समाप्ती झाल्यावर, आणि अशा कर्मचा-याच्या कुटुंबाने कालावधी वाढविण्यासाठी अर्ज केला असल्यास, अध्यक्ष प्रत्येक प्रकरणात आपल्या स्वेच्छाधिकारात येईल असा सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल असा वाढीव कालावधी समाप्त झाल्यावर; परिणामक होईल;

(दोन) ज्याची सेवा एका महिन्याहून कमी दिवसांच्या नोटीशीद्वारे समाप्त करण्यात आली असेल किंवा ज्याला सेवेतून कमी करण्यात आले असेल अशा कर्मचा-याबाबतीत, काढून टाकल्याची नोटीस दिल्याच्या दिनांकापासून एक महिन्याचा कालावधी किंवा यथास्थिति, कमी केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्यावर; परिणामक होईल; आणि

(तीन) इतर कारणास्तव ज्याचे वाटप रद्द करण्यात आलेले असेल अशा कर्मचा-याच्या बाबतीत अध्यक्ष, सर्वसाधारण व विशेष आदेशाद्वारे, वळोवेळी निश्चित करील अशा दोन महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीत परिणामक होईल. सहा महिन्यांच्या या अंतरिम कालावधीमधील वाढ ही सहा महिने, एक महिना किंवा यथास्थिति तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल किंवा असा कालावधी अध्यक्ष ठरवतील त्याप्रमाणे दोन महिन्यांपेक्षा अधिक नसेल, वाटपधारक भाडे माफ निवासस्थानासाठी हक्कदार असेल त्याव्यतिरिक्त निवासस्थानाचे भाडे यापूर्वी असेल त्याच दराने वसूल केले जाईल, वसुली योग्य असलेले भाडे, तो भाडे माफ निवासस्थानाकरिता हक्कदार कर्मचारी राहिला नसता तर यथास्थिति त्याला मृत्यूच्या, सेवेतून बडतर्फ केल्याच्या, काढून टाकल्याच्या, कमी केल्याच्या किंवा त्याची सेवा समाप्त केल्याच्या लगत पूर्वी त्याच्याकडून ज्या दराने भाडे वसूल केले असते त्याच दराने भाडे वसूली योग्य असेल.

[टी आर क्र.१२४, दि.२६.४.१९८२ याच्या परिणामी परिवहन मंत्रालयाने असे सूचित केले की, सर्वसाधारण भाडयाचे (अनुज्ञप्ती फी) प्रदान केल्यावर निवासस्थान ठेवून घेण्यासाठी (एक) पहिल्या चार महिन्यांचे, (दोन) आवश्यक भासल्यास आणखी चार महिन्यांचे, आणि (तीन) कुटुंबाच्या विनंतीवरून अध्यक्ष आपल्या स्वेच्छाधिकारात मुभा देईल अशा आणखी चार महिन्यांचा वाढीव कालावधीचे सामान्य दराने लायसन फी अदा केल्यावर निवासस्थानाचा कब्जा धारण करूदेण्याकरिता सुधारणा करण्यात यावी. कोणत्याही प्रकरणी अशी वाढ एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी देण्यात येऊ नये. (पहा मंत्रालयाचे अर्धशासकीय पत्र दि.७/१०.९.१९८२) त्यानुसार टी.आर. क्र.२९८, दि.११.१०.१९८२ या अन्वये संबंधित सुधारणा पारित करून तिला शासनाची मंजुरी प्राप्त झाली. परंतु, पत्रव्यवहाराच्या देवाण-घेवाणीनंतर, श्री. डी. आर. बन्सल, उप-सचिव यांचे अर्धशासकीय पत्र क्र.पीडब्ल्यू/पीईआर-१२/८३, दिनांक १९.५.१९८४ (दि.२७.१२.१९८५ व दि.१२.६.१९८६ रोजीचे मंत्रालयाची पत्रे) यांतील

सूचनेनुसार (एक) मागील प्रकरण बंद करण्याची आणि (दोन) सुधारित प्रस्ताव तातडीने सादर करण्याची मंत्रालयाने विनंती केली आहे.)]

(ख) मंडळास कोणत्याही कारणास्तव निवासस्थान वाटप रद्द करणे इष्ट किंवा आवश्यक आहे. त्यास असे वाटेल, अशा कोणत्याही प्रकरणात त्याच्या कर्मचा-याला केलेले कोणतेही निवासस्थानाचे वाटप ही आपल्या स्वेच्छाधिकारात रद्द करता येईल.

(ग) वाटपधारकाच्या निवासस्थानाचे वाटप रद्द करणारा मंडळाचा कोणताही आदेश मिळाल्यावर, वाटपधारक किंवा संपूर्ण निवासस्थान किंवा त्याचा कोणताही भाग जिच्या ताब्यात असेल अशी कोणतीही इतर व्यक्ती, ते निवासस्थान रिक्त करील आणि त्याचा ताबा मंडळाला किंवा मंडळाने त्याबाबत नियुक्त केलेल्या व्यक्तीला, आदेशात विनिर्दिष्ट केला असेल अशा कालावधीमध्ये सुपूर्द करील तसे करण्यात कसूर केल्यास, प्रशासन प्राधिका-यास किंवा मंडळाकडून त्याबाबत प्राधिकृत करण्यात येईल अशा इतर अधिका-यास वाटपधारकाला निवासस्थानातून हुसकवून लावण्यासाठी पोलिस सहाय्यासह मंडळाच्या वतीने कोणत्याही इलाखा, शहर दंडाधिका-याकडे अर्ज करता येईल.

(घ) मंडळाचा वाटप रद्द करणारा आदेश -

(एक) वाटपधारकाच्या किंवा ज्याच्याकडे संपूर्ण निवासस्थानाचा किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा ताबा असेल अशा इतर कोणत्याही व्यक्तीच्या स्वाधीन करून किंवा तिच्या हवाली सुपूर्द करून बजावता येईल, किंवा

(दोन) अशा प्रकारे स्वाधीन करता न आल्यास किंवा देता न आल्यास, तो, निवासस्थानाच्या बाहेरच्या दरवाज्यावर किंवा त्या निवासस्थानाच्या इतर कोणत्याही ठळक जागी लावून बजावता येईल, किंवा

(तीन) नोंदणीकृत डाकेने बजावता येईल.

(ङ) जो वाटप रद्द केल्यावर त्याला वाटप झालेल्या निवासस्थानाचा ताबा सोडण्यात जो वाटपधारक कसूर करील तो वाटपधारक ज्या दिनांकास निवासस्थानाचे वाटप रद्द झाले असेल त्या दिनांकापासून ते निवासस्थान प्रत्यक्ष रिकामे करील त्या दिनांकापर्यंत निवासस्थानाच्या प्रमाण भाडयाच्या आधारे निश्चित केलेल्या दराने निवासस्थान वापरण्यावद्दलची आणि ते ताब्यात ठेवण्यावद्दलची भरपाई देईल.

<u>अपिले</u> -

२२. या नियमांच्या विनियम २१ अनुसार ज्याच्याबाबत निवासस्थान वाटप रद्द करण्याचा एखादा आदेश देण्यात आला आहे, अशा कोणत्याही कर्मचा-याला, निवासस्थान रद्द करण्याचा आदेश प्राप्त झाल्याचा दिनांकापासून तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतर कोणतेही अपील दाखल करता येणार नाही या शर्तीच्या अधीन राहून, मंडळाकडे अपील करण्याचा हक्क असेल.

२२क. ज्याला नियतवाटप केलेल्या निवासस्थानात त्याच्यासोबत राहण्यासाठी कर्मचा-याच्या जवळच्या नातेवाईकास त्याच्यासोबत निवाससास्थानात राहू देण्याची परवानगी

नाकारणा-या प्रशासन प्राधिका-याने, विनियम ३ चा खंड(ङ) च्या उपखंड (चार) अनुसार दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही कर्मचा-याला अध्यक्षाकडे अपील करण्याचा हक्क असेल आणि त्याबाबतीत अध्यक्षांचा निर्णय अंतिम असेल.

२३. कोणताही वाटपधारक, प्रशासन प्राधिका-याच्या पूर्व परवानगी शिवाय, अधिकृत रजेचा कालावधी कोणताही असल्यास वगळून तीस दिवसांच्या किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीकरिता आपले निवासस्थान भोगवटाविना ठेवता येणार नाही.

२४. या विनियमांच्या प्रयोजनार्थ ज्याला भाडे प्रदानावर कोणत्याही निवासस्थानाचे वाटप करण्यात आले असेल असा कोणताही कर्मचारी तो कर्तव्यार्थ असो किंवा रजेवर असो निवासस्थान प्रत्यक्षपणे रिक्त करील तोपर्यंत त्या निवासस्थानाचा भोगवटा करीत आहे असे मानले जाईल.

सर्वसाधारण -

२५. मंडळ किंवा त्याचे कर्मचारी यांपैकी कोणीही, कोणत्याही वाटपधारकाच्या किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या किंवा सदस्यांच्या किंवा त्याच्यासोबत राहण्याची परवानगी दिलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या कोणत्याही मालमत्तेस चोरी, आग यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे झालेल्या कोणत्याही हानीसाठी किंवा नुकसानीसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

२६. वाटपधारक, या विनियमांच्या काटेकोर अनुपालनास आणि त्यांच्या कोणत्याही उल्लंघनास पूर्णपणे जबाबदार असेल मग असे उल्लंघन त्याने स्वताने किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने किंवा सदस्यांनी किंवा त्याच्यासोबत राहण्याची परवानगी दिलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीने केलेले असो.

२७. या विनियमांचे उल्लंघन केल्यावद्दल ज्याचे वाटप रद्द करण्यात आले असेल अशा कोणत्याही कर्मचा-याला, या विनियमांच्या उल्लंघनाचे स्वरूप लक्षात घेऊन, अध्यक्ष, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे ठरवील अशा कालावधीकरिता दुसरे वाटप केले जाण्यासाठी मनाई केली जाईल.

२८. वाटपधारक तास वगळून इतर कोणत्याही वेळी प्रशासन प्राधिका-याला आणि बंदर विश्वस्त मंडळाच्या मुख्य अभियंत्याला किंवा मुख्य यंत्र अभियंत्याला किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिका-याला रात्री १० ते पहाटे ५ या दरम्यानच्या कालावधीव्यातिरीक्त इतर कोणत्याही वेळी निवासस्थानाची पाहणी करण्याची परवानगी देईल. तथापि, अध्यक्षांची पूर्व परवानगी घेतल्यानंतर रात्री १० ते पहाटे ५ या दरम्यानच्या कालावधीमध्ये देखील निवासस्थानाची पाहणी करता येईल.

२९. हे विनियम प्रसिध्द करण्यापूर्वी केलेले वाटप पुढे चालू ठेवणे- त्यावेळी अंमलात असलेले नियम किंवा आदेश यांखालील या विनियमांच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अस्तित्वात

असणा-या कोणत्याही निवासस्थानाचे विधिग्राह्य वाटप हे या विनियमांन्वये यथोचितरित्या केलेले वाटप आहे असे मानले जाईल.

३०. विनियम शिथिल करणे- अध्यक्षाला कारणे लेखी नमूद करून त्या कारणास्तव कोणत्याही कर्मचा-याच्या किंवा निवासस्थानाच्या किंवा कर्मचा-यांच्या वर्गाच्या किंवा निवासस्थानाच्या प्रकाराच्या बाबतीत या विनियमांच्या संपूर्ण किंवा कोणत्याही तरतूदी शिथिल करता येतील.

३१. अधिकार सोपवणे - अध्यक्षास, या विनियमांद्वारे त्याला प्रदान करण्यात आलेले सर्व किंवा त्यापैकी कोणतेही अधिकार त्याला लादणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीन राहून, त्याच्या नियंत्रनाधीन असलेल्या अधिका-याकडे सोपवता येतील.

३२. विनियमांचा अर्थ लावणे - या विनियमांचा अर्थ लावण्याच्या संबंधात आणि यात वर तरतूद न केलेल्या निवासस्थानांच्या नियतवाटप संबंधीच्या आणि त्याच्या भोगवटासंबंधीच्या सर्व प्रकरणांमध्ये कोणताही प्रश्न उद्भवल्यास, त्यावरील अध्यक्षांचा निर्णय अंतिम असेल.

--------

## जोडपत्र - एक

### निवासस्थाने, त्याचे क्रमांक व प्रकार इत्यादी दर्शविणारी सूची.

[विनियम ५ खालील स्पष्टीकरण (३) पत्र]

--------

प्रकार चार

| अनुक्रमांक | रहिवासाच्या ठिकाणाचे नाव | निवासस्थानांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | चपराशी निवासस्थान, माहिम | २ | |
| २. | जूने 'एम' ब्लॉक, नाडकर्णी उद्यान | ६ | |
| ३. | प्रकार चारची निवासस्थाने, नाडकर्णी उद्यान | १५२० | |
| ४. | दवाखाना चपराशांची निवासस्थाने, वडाळा | २ | |
| ५. | पहारेक-यांचे निवासस्थान, शाळा आवार, वडाळा. | १ | |
| ६. | प्रकार चारची निवासस्थाने, शिवडी फोर्ट रोड, शिवडी | ४० | |
| ७. | जुनी ए.एफ.एस. निवासस्थाने, टिम्बर पॉंड, शिवडी | ३८ | |
| ८. | प्रकार चारची निवासस्थाने, जकेरिया बंदर | १२० | |
| ९. | जुनी आर. आर. क्र.९७८, कॉटन डेपो. | १ | |
| १०. | करमानी इमारत, कॉटन डेपो | १२ | |
| ११. | खोली क्र.३, पोर्ट ट्रस्ट इमारत, जुना आर. आर. क्र.८९६, काळा चौकी | १ | |
| १२. | सफाईगारांची व मेहतरांची निवासस्थाने, ओल्ड टँक बंदर | ४८ | |
| १३. | व्हिक्टोरिया ओव्हर ब्रिज क्वार्टर्स, ग्रेन डेपो | ३२ | |
| १४. | प्रकार चारची निवासस्थाने, पॅन्टान बंदर | १६० | |
| १५. | प्रकार चारची निवासस्थाने, नवाब टँक, ओव्हर ब्रिज, माझगाव | ४० | |
| १६. | प्रकार चारची निवासस्थाने, वाडी बंदर | ३६० | |
| १७. | वर्ग चारच्या कर्मचारीवर्गाची निवासस्थाने, क्र.१, माझगांव | ४ | |
| १८. | प्रकार चारची निवासस्थाने, पी.डी. डिमेलो रोड, वाडी बंदर | ४० | |
| १९. | प्रिन्स डॉक डिस्पेन्सरी निवासस्थाने, वाडी बंदर | ३ | |
| २०. | एलफिन्स्टन ब्रिज निवासस्थाने | २६ | |

| अनुक्रमांक | रहिवासाच्या ठिकाणाचे नाव | निवासस्थानांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| २१. | अग्निशमन दलाची निवासस्थाने पी.डी. डीमेलो रोड, वाडी बंदर | ४ | |
| २२. | चपराशांची निवासस्थाने, क्लाईव रोड | २४ | |
| २३. | यारीचालकांची निवासस्थाने, कारनॅक बंदर | ५२ | |
| २४. | प्रकार चारची निवासस्थाने, कारनॅक बंदर | ९० | |
| २५. | विल्सन हाऊस, माळ्यांची निवासस्थाने, ससून डॉक | २ | |
| २६. | सागर प्रेस गोडाऊन माळ्यांची निवासस्थाने, ससून डॉक | १ | |
| २७. | सार्वजनिक उद्यान माळी निवासस्थाने, अपोलो रेक्लेमेशन | १ | |
| २८. | माळी निवासस्थाने एव्हलिन हाऊस, कोलाबा | १ | |
| २९. | रेल्वे कार्यालयाच्या तळमजल्यावरील वर्ग चारची निवासस्थाने | १ | |
| ३०. | वर्ग चारची निवासस्थाने, मिलिटरी टिंबर डेपो | ७२० | |
| ३१. | वडाळा येथील जुन्या 'ब' प्रकारच्या वर्ग तीन - अ ला संलग्न असलेली नोकरांची निवासस्थाने | ६ | १९७५ चा टी आर क्र.५१० याच्या परिशिष्ट "ख" मध्ये समाविष्ट. पहा १९७८ चा टीआर क्र.७९ समाविष्ट |
| ३२. | वाडी बंदर,कलाईव रोड येथील जुने पन्हळीदार पत्र्याचे गोडाऊन | १ | १९७५ चा टी आर क्र.५१० च्या जोडपत्र "ख" मध्ये समाविष्ट. पहा १९७८ चा टी आर क्र.२५६. |

जोडपत्र - एक (चालू)

प्रकार तीन -ग

| अनुक्रमांक | रहिवासाच्या ठिकाणाचे नाव | निवासस्थानांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | प्रकार तीन - ग ची निवासस्थाने, नाडकर्णी उद्यान | ४८० | |
| २. | प्रकार तीन - ग ची निवासस्थाने, नाडकर्णी उद्यान, विस्तार | ६१६ | |
| ३. | प्रकार तीन - ग ची निवासस्थाने, वडाळा | ८० | |
| ४. | जूने ’ग’ प्रकारची निवासस्थाने जकेरिया बंदर | १२ | |
| ५. | प्रकार तीन ’ग’ ची निवासस्थाने, जकेरिया बंदर | २८० | |
| ६. | प्रकार तीन ’ग’ ची निवासस्थाने, पॅन्टून बंदर | ४० | |
| ७. | अग्निशमन सेवा निवासस्थाने, वाडीबंदर | ४० | |
| ८. | प्रकार तीन ’ग’ ची निवासस्थाने, बी.पी.टी. रूग्णालय, वडाळा. | ४० | |

## जोडपत्र - एक (चालू)

## प्रकार तीन -ख

| अनुक्रमांक | रहिवासाच्या ठिकाणाचे नाव | निवासस्थानांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | पोर्ट ट्रस्ट इमारत क्र.२३८, माहिम | १ | |
| २. | नाडकर्णी उद्यान विस्तार निवास्थाने, नाडकर्णी उद्यान | २४ | |
| ३. | लिपीक कर्मचारी वर्ग निवासस्थाने, वडाळा | ५८२ | |
| ४. | जुने आर. आर. क्र.९७८, कॉटन डेपो | १ | |
| ५. | लिपीक कर्मचारी वर्गाची निवासस्थाने, रे रोड | ८० | |
| ६. | द्वारपालाची निवासस्थाने, कार्यशाळा, माझगांव | १ | |
| ७. | अग्निशमन सेवा निवासस्थाने, पी.डी. डिमेलो रोड, वाडी बंदर | १ | |
| ८. | लाईटकीपरची निवासस्थाने, ससून डॉक | २ | |
| ९. | पोर्ट ट्रस्ट इमारत क्र. १६०, ससून डॉक | १ | |
| १०. | पोर्ट ट्रस्ट इमारत क्र.३१६, वरळी | १ | |
| ११. | प्रकार तीन ख ची निवासस्थाने, वरळी | ९० | |
| १२. | प्रकार तीन ख ची निवासस्थाने, बीपीटी रूग्णालय,वडाळा | ६० | |

जोडपत्र - एक (चालू)

प्रकार तीन - क

| अनुक्रमांक | रहिवासाच्या ठिकाणाचे नाव | निवासस्थानांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | जुने 'एम' ब्लॉक, नाडकर्णी उद्यान | २ | |
| २. | जुने 'ख' प्रकारची निवासस्थाने, वडाळा. | १० | |
| ३. | संपदा निरीक्षक निवासस्थाने, शिवडी | १ | |
| ४. | पोर्ट ट्रस्ट निवासस्थाने, धोलकर मार्ग, माझगांव | १ | |
| ५. | पोर्ट ट्रस्ट इमारत क्र.४२१ धोलकर मार्ग, माझगाव | २ | |
| ६. | प्रकार तीन-क निवासस्थाने, ॲन्डरसन हाऊस जवळ, माझगाव. | २० | |
| ७. | पोर्ट ट्रस्ट इमारत क्र.१६१, गेट हाऊस, ससून डॉक. | २ | |
| ८. | प्रकार तीन-क निवासस्थाने, वरळी बंदर | २० | |

<u>जोडपत्र - एक (चालू)</u>

<u>प्रकार - अधिकारी</u>

| अनुक्रमांक | रहिवासाच्या ठिकाणाचे नाव | निवासस्थानांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | क -1 प्रकार रेल्वे निवासस्थाने, वडाळा | ४ | |
| २. | क - प्रकार रेल्वे निवासस्थाने, वडाळा | २ | |
| ३. | वडाळा दवाखाना निवासस्थाने, वडाळा | १ | |
| ४. | इमारत क्र.335, शिवडी किल्ला, हिल, शिवडी | २ | |
| ५. | सहायक संपदा व्यवस्थापक निवासस्थाने, कॉटन डेपो | १ | |
| ६. | यार्ड फोरमन निवासस्थाने, कॉटन डेपो | २ | |
| ७. | गेट साईड, माझगाव | २ | |
| ८. | ग्लोरिया हाऊस, माझगाव | २ | |
| ९. | ॲन्डरसन हाऊस, माझगाव | १६ | |
| १०. | सागर दर्शन, माझगाव | ३३ | |
| ११. | प्रिन्स डॉक डिस्पेन्सरी निवासस्थाने, पी.डी.डीमेलो रोड. वाडी बंदर | २ | |
| १२. | कारनॅक बंदर पंपिग स्टेशन निवासस्थाने, कारनॅक बंदर | २ | |
| १३. | वाहतूक अधिका-यांची निवासस्थाने, प्रिन्स डॉक | ३ | |
| १४. | ह्युजेस निवासस्थाने, इंदिरा डॉक | २ | |
| १५. | बंदर विभाग निरीक्षक निवासस्थाने, इंदिर डॉक | १ | |
| १६. | इमारत क्र.174, ससून डॉक | २ | |
| १७. | कुलाबा हाऊस, कुलाबा | १६ | |
| १८. | कॅनरी हाऊस, कुलाबा | १६ | |
| १९. | कारंजा हाऊस, कुलाबा | १६ | |
| २०. | जॅकसन हाऊस, कुलाबा | ८ | |
| २१. | विल्सन हाऊस, कुलाबा | ६ | |
| २२. | दुगल हाऊस, कुलाबा | ३ | |
| २३. | एवलिन हाऊस, हेन्री रोड, कुलाबा | ४ | |
| २४. | फोसबेरी हाऊस, मेरीवेदर रोड, कुलाबा | ८ | |
| २५. | वैद्यकीय अधिका-यांची निवासस्थाने, बी.पी.टी. रूग्णालय, वडाळा | २० | |
| २६. | वैद्यकिय अधिका-यांची निवासस्थाने, कॉटन डेपो दवाखाना | २ | |
| २७. | वैद्यकीय अधिका-यांची निवासस्थाने, ॲन्टॉप व्हिलेज दवाखाना | ४ | |
| २८. | ॲन्टॉप हिल रोड, वडाळा येथील बी.पी.टी. रूग्णालयाच्या आवारातील ’चरक’, ’धन्वतंरी’ व ’सुश्रूत’ इमारती | ४२ | |

## जोडपत्र दोन

## नियतवाटपासाठी पात्र असणा-या कर्मचा-यांच्या विशेष संकोष व प्रवर्ग यामध्ये समाविष्ट केलेल्या निवासस्थानांचा तपशील.

### ( विनियम ६ च्या खंड( ६ ) च्या उपखंड ( ख ) पहा )

----------

| अनुक्रमांक | रहिवासाच्या ठिकाणाचे नाव | प्रकार | विशेष संकोषात समाविष्ट केलेल्या रहिवासाच्या ठिकाणांमधील निवासस्थानांची संख्या | वाटपासाठी पात्र असलेला प्रवर्ग विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| **(१)** | **(२)** | **(३)** | **(४)** | **(५)** | **(६)** |
| **१.** | जूना 'एम' ब्लॉक नाडकर्णी उद्यान | तीन - क | **१** | निवासस्थान निरीक्षक, कामगार विभाग | |
| **२.** | प्रकार तीन-क ची निवासस्थाने, ॲन्डरसन हाऊस जवळ, वडाळा | तीन - क | **१** | सागरी सर्वेक्षक, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **३.** | प्रकार तीन-क ची निवासस्थाने, ॲन्डरसन हाऊस जवळ, माझगांव | तीन - क | **३** | परमनंट वे निरीक्षक, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **४.** | लिपिक कर्मचारीवर्गाचे निवासस्थान, वडाळा | तीन - ख | **१** | सहा. सागरी सर्वेक्षक, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **५.** | लिपिक वर्गांची निवासस्थाने, वडाळा | तीन - ख | **१** | निवासस्थान निरीक्षक, कामगार विभाग | |
| **६.** | लिपिकवर्गांची निवासस्थाने, वडाळा | तीन - ख | **१** | कल्याण कार्यकर्ते, कामगार विभाग | |
| **७.** | लिपिक वर्गांची निवासस्थाने, रे रोड | तीन - ख | **१** | सह. सागरी सर्वेक्षक, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **८.** | प्रकार तीन-ग ची निवासस्थाने, नाडकर्णी उद्यान | तीन - ग | **१** | चार्जमन (सिग्नल) व (इंटरलॉकिंग) स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **९.** | प्रकार तीन-ग ची निवासस्थाने, नाडकर्णी उद्यान | तीन - ग | **१** | परमनंट वे मेइस्त्री, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **१०.** | प्रकार तीन-ग ची निवासस्थाने, नाडकर्णी उद्यान | तीन - ग | **५५** | लोको ड्रायव्हर, यंत्र अभियांत्रिकी विभाग | |
| **११.** | प्रकार तीन-ग ची निवासस्थाने, नाडकर्णी उद्यान | तीन - ग | **२०** | लोको फायरमन, यंत्र अभियांत्रिकी विभाग | |
| **१२.** | प्रकार तीन-ग ची निवासस्थाने, नाडकर्णी उद्यान | तीन - ग | **१** | मोटर ड्रायव्हर, लोको शेड, यंत्र अभियांत्रिकी विभाग | |
| **१३.** | प्रकार तीन-ग ची निवासस्थाने, नाडकर्णी उद्यान | तीन - ग | **१** | कल्याण कार्यकर्ता, कामगार विभाग | |

| अनुक्रमांक | रहिवासाच्या ठिकाणाचे नाव | प्रकार | विशेष संकोषात समाविष्ट केलेल्या रहिवासाच्या ठिकाणांमधील निवासस्थानांची संख्या | वाटपासाठी पात्र असलेला प्रवर्ग विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १३क | प्रकार तीन-ग ची निवासस्थाने, रूग्णालय आवार, वडाळा | तीन - ग | ४० | रूग्णालय कर्मचारीवर्ग | |
| १४. | प्रकार तीन-ग ची निवासस्थाने, नाडकणी उद्यान, विस्तार | तीन - ग | २९ | लोको ड्रायव्हर, यंत्र अभियांत्रिकी विभाग | |
| १५. | प्रकार तीन-ग ची निवासस्थाने, नाडकणी उद्यान, विस्तार | तीन - ग | १ | निवासस्थान निरीक्षक, कामगार विभाग | |
| १६. | प्रकार तीन-ग ची निवासस्थाने, जकेरिया बंदर | तीन - ग | १ | मोटर कार/व्हॅन ड्रायव्हर, लेखा विभाग | |
| १७. | प्रकार तीन-ग ची निवासस्थाने, जकेरिया बंदर | तीन - ग | १ | मोटार कार चालक, विधि विभाग | |
| १८. | प्रकार तीन-ग ची निवासस्थाने, पॅन्टन बंदर | तीन - ग | २ | चार्जमन (सिग्नल व इंटर लॉकिंग) स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| १९. | प्रकार तीन-ग ची निवासस्थाने, पॅन्टन बंदर | तीन - ग | २ | परमनंट वे मेइस्त्री, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| २०. | प्रकार तीन-ग ची निवासस्थाने, पॅन्टन बंदर | तीन - ग | १ | सहा. सागरी सर्वेक्षक, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| २१. | अग्निशमन सेवा निवासस्थाने, वाडी बंदर | तीन - ग | ३० | अग्निशामक, अग्निशमन सेवा पोर्ट विभाग | |
| २२. | अग्निशमन सेवा निवासस्थाने, वाडी बंदर | तीन - ग | १० | सब-स्टेशन लिडर, फायर सर्व्हिस, पोर्ट विभाग | |
| २३. | प्रकार चारची निवासस्थाने, नाडकर्णी उद्यान | चार | २ | फिटर, रेल्वे अभियांत्रिकी विभाग, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| २४. | प्रकार चार ची निवासस्थाने, नाडकर्णी उद्यान | चार | १ | परमनंट वे मुकादम, स्थापत्य अभियात्रिकी विभाग | |
| २५. | प्रकार चार ची निवसस्थाने, नाडकर्णी उद्यान | चार | ८ | ट्रालीमॅन रेल्वे अभियांत्रिकी विभाग, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| २६. | प्रकार चार ची निवासस्थाने, नाडकर्णी उद्यान | चार | १५ | गॅंगमॅन स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| २७. | प्रकार चार ची निवासस्थाने, नाडकर्णी उद्यान | चार | २ | मजदूर (सिग्नल व इंटरलॉकिंग), स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| २८. | प्रकार चार ची निवासस्थाने, नाडकर्णी उद्यान | चार | २९ | लोको फायरमॅन, यंत्र अभियांत्रिकी विभाग | |
| २९. | प्रकार चार ची निवासस्थाने, पॅन्टन बंदर | चार | ४ | फिटर, रेल्वे अभियांत्रिकी विभाग, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |

| अनुक्रमांक | रहिवासाच्या ठिकाणाचे नाव | प्रकार | विशेष संकोषात समाविष्ट केलेल्या रहिवासाच्या ठिकाणांमधील निवासस्थानांची संख्या | वाटपासाठी पात्र असलेला प्रवर्ग विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| **(१)** | **(२)** | **(३)** | **(४)** | **(५)** | **(६)** |
| **३०.** | प्रकार चार ची निवासस्थाने, पॅन्टन बंदर | चार | **४** | ट्रॉलीमॅन, रेल्वे अभियांत्रिकी विभाग, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **३१.** | प्रकार चार ची निवासस्थाने, पॅन्टन बंदर | चार | **१२** | गँगमॅन स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **३२.** | प्रकार चार ची निवासस्थाने, पॅन्टन बंदर | चार | **४** | मजदूर (सिग्नल व इंटरलॉकिंग), स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **३३.** | प्रकार चार ची निवासस्थाने, पॅन्टन बंदर | चार | **१** | लंच गाईड, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **३४.** | प्रकार चार ची निवासस्थाने, पॅन्टन बंदर | चार | **१** | तिन्डेल, सागरी सर्वेक्षक शाखा, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **३५.** | प्रकार चार ची निवासस्थाने, नवाब टँक, ओव्हरब्रिज, माझगाव | चार | **२** | परमनंट वे मुकादम, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **३६.** | प्रकार चार ची निवासस्थाने नवाब टँक, ओव्हरब्रिज, माझगाव | चार | **१२** | ट्रॉलीमेन, रेल्वे अभियांत्रिकी विभाग, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **३७.** | प्रकार चार ची निवासस्थाने, नवाब टँक, ओव्हरब्रिज, माझगांव | चार | **१८** | गँगमॅन, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **३८.** | प्रकार चार ची निवासस्थाने, वाडीबंदर | चार | **६** | जॉलीबोट टिंडेल, सागरी सर्वेक्षण शाखा, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **३९.** | प्रकार चार ची निवासस्थाने, वाडीबंदर | चार | **१३** | लासकर, सागरी सर्वेक्षण शाखा, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **४०.** | प्रकार चार ची निवासस्थाने, पी.डी. डिमेलो रोड, वाडीबंदर | | **१** | लासकर, सागरी सर्वेक्षण शाखा, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | |
| **४१.** | प्रकार चार ची निवासस्थाने, कारनॅक बंदर | चार | **१०** | फायरमॅन, फायर सर्व्हिस, फोर्ट विभाग | |
| **४२.** | प्रकार तीन-ख निवासस्थाने, बी.पी.टी. रूग्णालय, वडाळा | तीन-ख | **६०** | नर्सिंग सिस्टर, बी.पी.टी. रूग्णालय, वडाळा | |

-----------